महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन,कल्याण
पत्ताः– भवानी चौक, प्रेम ॲटो पेट्रोलपंपाजवळ
कल्याण मुरबाड रोड, कल्याण (प) जि. ठाणे
फोन नं. ०२५१–२३१४८००
Email:- cp.thane.mfc@mahapolice.gov.in

# महात्मा फुले चौक पो. स्टे. कल्याण गुन्हा रजि. नं. २२२/२०२४ भा.द.वि.कलम ४२०,३४ या गुन्हयातील आरोपीतास शिताफीने पकडुन एटीएम कार्ड फसवणूकीचे १६ गुन्हे उघडकीस आणलेबाबत

प्रेस नोट                                        दिनांक १५/०४/२०२४

महात्मा फुले चौक पो. स्टे. कल्याण हद्दीत ०२/०३/२०२४ रोजी १३:३० वा. दरम्यान फिर्यादी कु. महेश्वरी विजय मुदलीयार, वय २८ वर्षे, व्यवसाय –नोकरी रा. पुनम अर्पाटमेंट, हनुमान नगर, रूम नंबर १०, कोळसेवाडी, ता. कल्याण पुर्व या त्यांचे आईसोबत कल्याण पश्चिम येथील कोटक महिंद्रा बॅकेचे एटीएम मधुन पैसे काढण्याकरीता गेल्या असता वरील दोन अनोळखी इसमांनी मदत करण्याच्या बहाण्याने फिर्यादीचे एटीएम कार्ड अदलाबदली करून फिर्यादीचे कोटक महिंद्रा बॅकेच्या सॅलेरी अकाउंट मधुन एकुण रक्कम २२,०००/रू.लबाडीने काढुन घेवुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली केली होती सदर घटने बाबत महात्मा फुले चौक पोलीस ठाणे येथे २२२/२०२४, भा.द.वि कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री.शैलेश साळवी यांनी अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी तपास पथक तयार केले होते. तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खात्रीशीर माहितीचे आधारे सापळा रचुन वॉच करून इसम नामे दिपक बिपीन झा, वय ३२ वर्षे, रा. रमाबाई आंबेडकर नगर, झोपडपट्टी, गुप्ता किराणा दुकान जवळ, उल्हासनगर २, ता. अंबरनाथ, जि. ठाणे यास दिनांक ०७/०४/२०२४ रोजी अटक केली आहे. आरोपी दिपक बिपीन झा यास विश्वासात घेवून त्याच्याकडे तपास केला असता, त्याने त्याचा साथीदारासह एटीएम सेंटरमधून एटीएम कार्ड हातचलाखीने अदलाबदल करून बोलण्यात गुतवून पिन नंबर पाहून एटीएम मधुन पेसे काढून फसवणूकीचे गुन्हे केले असल्याचे सांगीतले. त्याने कल्याण, वसई, डोंबिवली, भिवंडी, अंबरनाथ, ठाणे, मुंब्रा, नवी मुंबई, नांदेड व नाशिक जिल्हयात विविध पोलिस ठाणे हद्दीत अशा एकुण १६ फसवणूकीचे गुन्हे केले असल्याचे कबुली दिली आहे. तसेच मुख्य आरोपीत दिपक बिपीन झा याचेविरूध्द यापुर्वी ८ फसवणूकीचे गुन्हे दाखल आहेत. नमुद आरोपी हा त्याचे साथीदारांसह ठाणे, नवीमुंबई, नाशिक, नोंदेड, पुणे या जिल्हयात फसवणूकीचे गुन्हे केले असून आरोपीताने ताब्यात वेगवेगळया बॅकांची ९२ ए.टी.एम. कार्ड व २६,०००/–रू. रोख रक्कम व एक मोटर सायकल हस्तगत करण्यात आली आहे. त्याप्रमाणे तपास सुरू आहे.

सदर गुन्हयाचा तपास पाउपनिरी/तानाजी वाघ हे करीत आहेत. सदर अटक आरोपीकडुन खालील गुन्हे उघडकीस आलेले असुन त्याचेकडुन सदर १६ गुन्हयातील एकुण वेगवेगळया बॅकांची ९२ ए.टी.एम. कार्ड व २६,०००/–रू. रोख रक्कम व एक मोटर सायकल हस्तगत करण्यात आली आहे.

| अ.न. | पोलीस स्टेशन | गु.रजि.नं. व कलम |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ०१ | महात्मा फुले चौक पो.स्टे. | २२२/२०२४ भादंवि.कलम ४२०,३४ |
| ०२ | महात्मा फुले चौक पो.स्टे. | ३२१/२०२४ भादंवि.कलम ४२०,३४ |
| ०३ | महात्मा फुले चौक पो.स्टे. | ३५८/२०२४ भादंवि.कलम ४२० |
| ०४ | महात्मा फुले चौक पो.स्टे. | ३७४/२०२४ भा.दं.वि.कलम ४२० |
| ०५ | वालीव (वसई) पो.स्टे. | २१६/२०२४ भा.दं.वि.कलम ४२० |
| ०६ | डोंबिवली पो.स्टे. | ४८८/२०२४ भा.दं.वि.कलम ४२० |
| ०७ | भिवंडीशहर पो.स्टे. | १८१/२०२४ भा.दं.वि.कलम ४२० |
| ०८ | भिवंडीशहर पो.स्टे. | ३९५/२०२४ भा.दं.वि.कलम ४२० |
| ०९ | भिवंडीशहर पो.स्टे. | ३९७/२०२४ भा.दं.वि.कलम ४२० |
| १० | शिवाजीनगर पोलिस ठाणे | ४९४/२०२३ भा.द.वि.कलम ४२० |
| ११ | ठाणेनगर पोलिस ठाणे | १०९/२०१९ भा.द.वि.कलम ३९२,५०६,३२३,३४ |
| १२ | मुंब्रा पोलिस ठाणे | ९८८/२०२३ भा.द.वि.कलम ४२० |
| १३ | भाग्यनगर,नांदेड पो.स्टे. | १४७/२०२४ भा.द.वि.कलम ४२०,३४ |
| १४ | वाडीवा पोलिस ठाणे (नाशिक ग्रामीण) | ८/२०२४ भा.द.वि.कलम ४२०,३४प्रमाणे |
| १५ | कोनगाव पोलिस ठाणे | १३६/२०१७ भा.द.वि.कलम ४२०,४०६, ३४ |
| १६ | रबाळे पो.स्टे. नवी मुंबई | ४४/२०२४ भा.द.वि.कलम ४२०,३४प्रमाणे |

वरील नमुद गुन्हयात उत्कृष्ठ कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त श्री. दत्तात्रय शिंदे सो., मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, श्री. सचिन गुंजाळ, मा. सहायक पोलीस आयुक्त, कल्याण विभाग, श्री. कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली मा.वपोनि श्री. शैलेश साळवी, पोउपनिरि/तानाजी वाघ, पोहवा/६४१७ के. जी. जाधव, पोहवा/३८६५ मनोहर चित्ते, पोहवा/८०८५ जितेंद्र चौधरी, पोना/७०८३ आनंद कांगरे, पोना/७१८० किशोर सुर्यवंशी, पोशि/३०९३ दिपक थोरात, पोना/७०७९ सुमित मधाले, पोशि/४१९१ श्रीधर वडगावे यांनी केली आहे.